# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ९९-२३** **दिनांक :- २७/०३/२०२३**

## “१२६ ग्रॅम वजनाचा २५,२०,०००/-रु किंमतीचा एम.डी. (मॅफेड्रॉन) हा अंमली पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीतावर कारवाई - अमली पदार्थ विरोधी कक्षाची कामगिरी”

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गतनालासोपारा परिसरात अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणाऱ्या ईसमांविरुध्द कारवाई करण्याबाबत वरीष्ठांनी आदेश दिले होते.

त्या अनुषंगाने दि.२५.०३.२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे प्रभारी पोलीस निरीक्षक अमर मराठे यांनी कायदेशीर बाबीची पुर्तताकरुन पोलीस पथकसह नालासोपारा परीसरात रवाना होवुन गस्ती दरम्यान नालासोपारा (पुर्व), सेंट्रल पार्क येथील श्रीगणेश अपार्टमेंट जवळ रोड लगत एक ईसम त्याचे हातात काळया रंगाची प्लॅस्टीकची पिशवी बाळगला असताना मिळुन आला तसेच तो कोणाची तरी वाट पाहत असल्याचे निर्दशनास आले तसेच त्याचे हालचाल संशयास्पद वाटत असल्याने त्याचेकडे कोणतातरी अंमली पदार्थ असल्याची शक्यता निर्माण झाल्याने त्यास ताब्यात घेवुन तात्काळ दोन पंचांना बोलावुन घेवुन छापा पंचनामा दरम्यान ईसम गितेश अनंत प्रभु रा.टिटवाळा (पुर्व) याचे कब्ज्यात **१२६ ग्रॅमवजनाचा २५,२०,०००/-रु. किंमतीचा मॅफेड्रॉनहा अंमली पदार्थ व्यापारी प्रमाणात विक्री करीता कब्जात बाळगला असताना मिळुन आले** असुन सदर अंमली पदार्थ अंग झडती पंचनाम्याव्दारे जप्त करण्यात आला असुन नमुद ईसमा विरुध्द एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम ८(क), २२ (क) प्रमाणे तुळींज पोलीस ठाणे गुन्हा नोंदक्र. ।। २६३/२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास अंमली पदार्थ विरोधी कक्ष करत आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधीकक्षाचे प्रभारी पो.नि/अमर मराठे, सपोनि/विलास कुटे, अमोल आंबावणे, पो.हवा./टक्के, पो.हवा./आव्हाड, पो.हवा/पाटील, पो.हवा./ इंगळे, पो.हवा./ पाटील, पो.हवा/ सपकाळ, मपोहवा/ एक्कलदेवी व पो.शि/यादव यांनी केली आहे.


अंमली पदार्थ विरोधी कक्ष
मिरा-भाईंदर वसई-विरार